महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५७ /२०२३ दि. २०/०९/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** वाहतुक उप विभाग विठ्ठलवाडी हद्दीत दि. ०१/१०/२०२३ रोजी १३ दिवसांचे गणपती विसर्जन करण्यात येणार आहे. त्यानिमित्त काढण्यात येणारी मिरवणूक जंगल हॉटेल येथून सुरू होवून श्रीराम चौक, उल्हासनगर ४ येथे समाप्त होणार आहे. सदर ठिकाणी वाहतूकीची कोंडी होवू नये तसेच सदर भागात वाहतूक सुरळीत व सुरक्षीत रहावी याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) व्हिनस चौक कडून मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **व्हिनस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने व्हिनस चौक कडून डावे वळण घेवून माणेरे गाव व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) श्रीराम चौक कडून मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शासकीय हॉस्पिटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने उल्हासनगर रेल्वे स्टेशन रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) श्रीराम चौक कडून ओ.टी. सेक्शन मेन मार्केट कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रीराम चौक, पेट्रोल पंप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने श्रीराम चौक, पेट्रोल पंप येथून व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दिनांक ०१/१०/२०२३ रोजी दुपारी १६.०० वा. ते २४:०० वाजेपावेतो गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली व उल्हासनगर म.न.पा.

CS CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u> :– <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>**
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u> :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>**
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

सपोआ वाहतूक विभाग उल्हासनगर व कल्याण, पोनि. उल्हासनगर/विठठलवाडी/कल्याण वाहतुक उपविभाग.
२/– उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner